महाराष्ट्र पोलीस अॅकडमी, नाशिक

प्रशि. पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा) सत्र क्रमांक 111,

अंतिम परिक्षा, जानेवारी - 2015

| | | |
|---|---|---|
| पेपर क्रमांक | - 02 | एकुण गुण- 100 |
| विषय | - फौजदारी प्रक्रिया संहिता | वेळ - 1000 ते 1300 |
| दिनांक | - 19/01/2015 | वार - सोमवार |

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सूचना :

अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहे.
क. वाचनीय अक्षरात उत्तरे लिहावी.
ड. फक्त निळया / काळया पेनचाच वापर करावा.
इ. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
ई. मोबाईल फोन / पुस्तके परिक्षा कक्षात आणण्यास मनाई आहे.
उ. परिक्षा सुरु असतांना कॉपी करतांना किंवा बोलतांना आढळून आल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
ऊ. पुरवणी उत्तरपत्रिकेवर नाव व रोल नंबर लिहू नये.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

**प्र.1 खालील परिच्छेद वाचून त्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे द्या.** गुण

प्रभाकर विठ्ठल कुलकर्णी, वय 38 वर्षे, रा. सारंग कॉलनी, शिवाजी पार्क, मुंबई हे दिनांक 20.12.2014 रोजी त्यांचे कुटुंबासह राहते घरास कडीकुलूप लावून मुळगावी सातारा येथे देवदर्शनासाठी गेले होते. दिनांक 24.12.2014 रोजी घरी परतले असता कडी, कुलूप तुटलेले आणि कपाटातील रोख रक्कम रु.40,000/- चोरीस गेल्याचे निष्पन्न झाले.

सदर घटनेच्या अनुषंगाने शिवाजी पार्क पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल होऊन एक आरोपी अटक करण्यात आला. तपासादरम्यान चोरीस गेलेला मुद्देमाल आरोपीच्या घरातून जप्त करण्यात आला.

[अ] सदर घटनेच्या अनुषंगाने गुन्हा दाखल करावयाची क्रियारीती कलमासह स्पष्ट करा. 10

[ब] सदर गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपीच्या घराची झडती घेण्याची पध्दत कलमासह स्पष्ट करा. 10

[क] तपासादरम्यान आरोपीने गुन्हा करण्यासाठी वापरलेल्या रिक्षाचा मालक निष्पन्न झाला असून त्याचा फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम 164 नुसार जबाब नोंदविण्याची क्रियारीती स्पष्ट करा. 10

[ड] सदर तपासामध्ये आरोपीविरुध्द सबळ पुरावा निष्पन्न झाल्याने कोर्टात सादर करावयाच्या अहवालाबाबत कलमासह चर्चा करा. 10

**प्र.2** संशयीत व्यक्तीकडून चांगल्या वागणुकीसाठी जामीन घेणेबाबत कोणत्या कलमानुसार काय कारवाई केली जाते? 10

**प्र.3** गुन्हे अन्वेषणातील कारवाईचा रोजनामा (केस डायरी) याबाबत कलमासह क्रियारीती स्पष्ट करा. 10

प्र.4 ~~अटकपूर्व जामीन विषयक फौजदारी प्रक्रिया संहिता मधील कलमांसह क्रियारीती स्पष्ट करा. 20~~

प्र.5 दिनांक 15.06.2014 रोजी विनायक शामराव कदम,वय 37 वर्षे, रा. पंत नगर, घाटकोपर यांनी कर्जबाजारी झाल्याने घरातील पंख्याला लटकून आत्महत्या केली. त्यांच्या हस्ताक्षरातील 'माझ्या मृत्यूस कोणीही जबाबदार नाही' अशी चिठ्ठी त्यांचे शर्टच्या खिशात मिळून आली. 20

सदर घटनेच्या अनुषंगाने आपण तपासी अधिकारी म्हणून कोणत्या कलमानुसार प्रकरण दाखल करुन काय कारवाई कराल? सविस्तर विषद करा.

***